## रे.मु.नं.२७१/२०१४ निशाणी १९ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीनी प्रतिवादीकडून अंतरीम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन असे की,**

२. वादी क्र. १ ही प्रतिवादीची पत्नी व वादी क्र. २ ते ४ या प्रतिवादीच्या अज्ञान मूली आहेत. प्रतिवादीने ५ वर्षापूर्वी वादीना घरातून हाकलून देवून त्यांचा त्याग केलेला आहे व स्वत: व्यभिचारी जीवन जगत आहे. तो वादीना जीवे मारण्याच्या धमक्या देतो. त्याने वादीच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही किंवा करण्यास तयार नाही. याउलट त्याच्या नावे असलेल्या वडीलार्जीत जमीनीची विक्री करून विल्हेवाट लावण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामूळे वादीनी त्यांच्या उदरनिर्वाहाकरीता पोटगी ठरवून मिळण्यासाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे. वादी पुढे असे कथन करतात की, प्रतिवादी याची परीस्थिती श्रीमंतीची आहे. त्याची स्वत:ची घरजागा तसेच कळंब येथे प्लॉटस आहेत. त्याला शेती , दूध व्यवसाय व जनावरे खरेदी विक्री पासून दरवर्षी रू ६ ते ७ लाख उत्पन्न मिळते. त्याची वादी क्र. १ ते ४ यांना दरमहा प्रत्येकी रू ५०००/— प्रमाणे एकूण दरमहा रू २०,०००/— पोटगी देण्याची ऐपत आहे. सदर दाव्याची चौकशी होउन अखेरचा निर्णय होण्यास बराच कालावधी जाणार आहे. वादी क्र. १ ही तिच्या माहेरी अज्ञान वादी क्र. २ ते ४ यांच्यासह अत्यंत हलाखीचे दिवस जगत आहे. वादी क्र. १ यास कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अशापरीस्थितीत दाव्याचा अंतीम निर्णय होण्यास बराच कालावधी लागणार असल्याने वादी क्र. १ ते ४ यांच्या दैनंदीन गरजा , कपडालत्ता, घरभाडे , अन्नधान्य,औषधपाणी तसेच वादी क्र. २ ते ४ यांचा शिक्षणखर्च भागवण्यासाठी दाव्याचा अंतीम निर्णय होइपर्यत वादी क्र. १ ते ४ यांस प्रत्येकी रू ५०००/— प्रमाणे दरम्यानची पोटगी मिळावी. पोटगी मंजूर न झाल्यास वादींवर अन्याय होवून त्यांची उपासमार होणार आहे व त्यांना जीवन जगणे असहय होणार आहे. त्यामूळे वादीनी प्रतिवादीकडून प्रत्येकी दरमहा रू ५०००/— अशी एकूण रू २०,०००/— दरम्यानची पोटगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने त्याचे म्हणणे नि.क्र.२४ वर दाखल करून वादींच्या अर्जास आक्षेप घेतला आहे. त्याने असे कथन केले आहे की, त्याचे वादी क्र. १ बरोबर हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे विधीपुर्वक लग्न झालेले नाही. त्यामूळे त्यांना पोटगी मागण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. प्रतिवादीचे लग्न अनुसया हिच्याशी झालेले असून ते पतीपत्नी म्हणून जीवन जगत आहेत. त्या लग्न संबंधातून त्यास रोहीत नावाचा मूलगा जन्मलेला आहे. त्याचे पालनपोषण करणे ही प्रतिवादीची कायदेशीर जबाबदारी आहे.

४. प्रतिवादी पुढे असे कथन करतो की त्यास फकत गट नं.५०३ मध्ये ३५ आर शेतजमीन आहे. गट नं. ४४१ या जमीनीशी प्रतिवादीचा काहीही संबंध नाही. त्याचा कोणताही दूधाचा व्यवसाय, तसेच जनावरे खरेदीविक्रीचा व्यवसाय नाही. किंवा त्यास ६ ते ७ लाखाचे उत्पन्न मिळत नाही. त्याचे कळंब येथे कोणतीही जागा किंवा प्लॉट नाही. याउलट वादीचे उत्पन्न प्रतिवादीच्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे. वादी नं.१ हिस श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेतून महाराष्ट्र शासनाकडून रक्कम मिळते. तिला शिलाईचे काम येते व त्यापासून दरमहा ३ १/२ ते ४ हजार रूपये मिळतात. इतकेच नव्हेतर, तिच्या वडीलांना १५ एकर बागायत शेतजमीन आहे, हिंदू वारस कायद्यातील तरतूदींप्रमाणे तिच्या हिश्शास ५ एकर जमीन येते त्यामूळे वादीना उत्पन्नाचे साधन आहे. प्रतिवादी हा मोलमजूरी करतो. त्याच्या वडीलांना ह्रदयविकार व मधूमेह हे आजार होते ते १० वर्षापासून आजारी असल्यामूळे प्रतिवादी हा कर्जबाजारी झाला आहे व त्यात त्याने जमीन विक्री केली आहे. त्याची पोटगी देण्याची ऐपत नाही. प्रतिवादी पुढे असे कथन करतो की, वादी क्र. २ ते ४ यांचे शिक्षण मोफत आहे त्यांच्या जेवणाची सोय महाराष्ट्र शासनाने मोफत केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजीक न्यायविभागाकडून वादी क्र. २ ते ४ हे एन.टी—३ यात मोडत असल्याने त्यांना वसतीगृहात राहून मोफत शिक्षण,कपडालत्ता व सर्व दैनंदीन गरजा महाराष्ट्र शासन पुरवते, त्यांचा कोणताही शिक्षणाचा खर्च नाही. वादी क्र. २ चे लग्न झालेले आहे, ती धोत्रे ता. बार्शी येथे तिच्या सासरी नांदत आहे. ही बाब मे. न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे. अशाप्रकारे प्रतिवादीची पोटगी देण्याची ऐपत नाही. वादीना पोटगी मागण्याचा कायद्याने कोणताही अधिकार नाही. त्यामूळे प्रतिवादीने वादीच्या दरम्यानची पोटगी मिळण्याचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

५. वादीतर्फे वकील श्री.एन.एन.काझी व प्रतिवादीतर्फे वकील श्री. एस.एस.जाधवर यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, वादी क्र. १ ही प्रतिवादीची पत्नी नाही. प्रतिवादीची जमीन ही कळंब जि.उस्मानाबाद या ठिकाणी आहे त्यामूळे या न्यायालयास अधिकारक्षेत्र नाही, त्यामूळे अर्ज नामंजूर करावा. याउलट वादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, वादी हे मौजे घोळवेवाडी या ठिकाणी रहात आहेत त्यामूळे या न्यायालयास अधिकारक्षेत्र आहे. वादीना उपजीवीकेचे कोणतेही साधन उपलब्ध नाही त्यामूळे वादीचा अर्ज मंजूर करावा.

६. उभयपक्षाचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मूद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालील प्रमाणे नोंदविलेले आहेत.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. वादी हे प्रतिवादीकडून अंतरीम पोटगी मिळविण्यास पात्र आहेत काय? असल्यास किती? | अंशतः होय. वादी क्र.१दाव्याचा अंतीम निकाल लागेपावेतो व वादी क्र. २ ते ४ हे ते सज्ञान होईपर्यंत प्रत्येकी रू १०००/— |

दरमहा पोटगी मिळविण्यास पात्र आहेत

२. आदेश काय? अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ करीता:—**

७. प्रतिवादीनी वादी क्र. १ व त्याच्यातील वैवाहीक संबंध नाकारले आहेत. त्याच्यामते, अनूसया हिच्याशी त्याचा कायदेशीर विवाह झालेला आहे. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे न्याहाळता प्रतिवादीने त्याचा विवाह अनुसया हिच्याशी कायदेशीररीत्या झाल्याचा व त्यापासून त्यास रोहीत नावाचा मूलगा झाल्याचे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. याउलट, वादीने वादी क्र. १ चा विवाह दि.१.०६.१९९६ रोजी झाल्याचे दाखवणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे त्याचबरोबर त्यांचेतर्फे साक्षीदार शरद दादाहरी घोळवे याचे प्रतिज्ञापत्र दाखल करून त्यामध्ये वादी. क्र. १ हिचा विवाह प्रतिवादीशी झाल्याचा व त्यापासून वादी क्र. २ ते ४ यांचा जन्म झाल्याचे शपथेवर कथन केले आहे. त्याचप्रमाणे वादी क्र. २ हिचे जन्म प्रमाणपत्र वादी क्र. ३ व ४ यांच्या शाळा सोडल्याचे दाखल्याच्या छायांकीत प्रति दाखल केल्या आहेत. त्यामध्ये प्रतिवादीच्या नावाचा उल्लेख वादी क्र. २ ते ४ यांचे वडील असा आहे. त्यामूळे सुकृतदर्शनी वादी क्र. २ ते ४ यांचा जन्म अनैतीक संबंधातून झाला असल्याचे वाटत नाही. याउलट, प्रतिवादीनी त्याचा विवाह अनुसयाशी कधी झाला व त्यातून रोहीतचा जन्म कधी झाला हे नमूद केलेले नाही. सोयीसाठी काही काळाकरीता असे गृहीत धरले की, वादी क्र. २ ते ४ ही प्रतिवादीची अनैतीक संबंधातून झालेली मूले आहेत, तरीही 'हिंदू पोटगी आणि दत्तक कायदा', १९५६ च्या कलम २० नूसार अनौरस मूलेदेखील अज्ञान असे पावेतो त्यांच्या वडीलांकडून पोटगी मिळविण्यास पात्र आहेत. त्यामूळे वादी क्र. २ ते ४ हे पोटगी मिळविण्यास पात्र नाहीत हे प्रतिवादीचे कथन मान्य करता येणार नाही. प्रतिवादीच्या कथनानूसार वादी क्र.२ हिचे लग्न झाल्याबाबत दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

८. वादीने दाखविलेल्या ग्रामपंचायत घोळवेवाडी येथील दाखला पाहता जरी तिचे लग्न प्रतिवादीशी झाले आहे असे नमूद नसले तरी त्यांच्यातर्फे साक्षीदाराने सदरचा विवाह झाला असल्याचे शपथेवर कथन केले आहे. याउलट प्रतिवादीने कोणतेही शपथपत्र दाखल केलेले नाही. वादीने दाखल केलेले तिचे ओळखपत्र पाहता त्यावर 'जयश्री शंकर मुंढे' असे नाव नमूद आहे. प्रतिवादीने अनूसया हि त्याची पत्नी असल्याचे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केलेला नाही. त्यामूळे वादी क्र. १ व प्रतिवादी यांचा विवाह झाल्याचे व त्यातून वादी क्र. २ ते ४ यांचा जन्म झाल्याचे सुकृतदर्शनी दिसते. वादी क्र.१ ही शिलाई काम करते असे दाखविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. वादी क्र. २ ते ४ हे अद्याप शिक्षण घेत आहेत त्यामूळे वादी हे स्वत:चा सांभाळ करण्यास सक्षम नाहीत असे सूकृतदर्शनी आढळते. त्यामूळे वादी हे प्रतिवादीकडून अंतरीम पोटगी मिळविण्यास पात्र आहेत या

निष्कर्षापर्यंत मी पोहचलो.

९. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादीस कळंब येथे जागा आहे, तो दूधाचा व जनावरे खरेदीविक्रीचा व्यवसाय करतो असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. परंतू त्यास मौजे गोविंदपूर येथे एकूण २ हे ३७ आर शेतजमीन असल्याचे दर्शविणारे सातबारा उतारे अभिलेखावर दाखल आहेत. याउलट वडीलांच्या आजारासाठी प्रतिवादीने जमीन विक्री केल्याचा पुरावा प्रकरणात दाखल नाही. त्यामूळे प्रतिवादीस एकूण २ हे ३७ आर शेतजमीन असल्याचे दिसते. वरील शेतजमीनीत तूर, मका, सोयाबीन, हरभरा, कापूस व हायब्रीड अशी पिके असल्याचे नोंद सातबा—यावर आहे. वरील क्षेत्राचा सातबारा उतारा जरी एकत्रात असला तरी प्रतिवादीने त्याच्या शेतातून कोणतेच उत्पन्न निघत नाही असे कथन केलेले नाही. वादी क्र. १ हीस शिवणकाम येत असल्याबाबतदेखील कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. परंतू वादी क्र. १ हीस संजय गांधी निराधार योजनेंतर्गत रू ६००/—प्रमाणे अनूदान सुरू असल्याचे दर्शविणारा दाखला अभिलेखावर उपलब्ध आहे. परंतू सध्याच्या परीस्थितीत वस्तूंच्या किंमती व झपाटयाने वाढणारी महागाई पाहता दरमहा रू ६००/— एका व्यक्तीस पुरतील ही गोष्ट हास्यास्पद वाटते. वादी क्र. २ ते ४ हे वसतीगृहात राहून शिक्षण घेतात हे दाखवणारा ही कोणताही दस्तऐवज अभिलेखावर नाही. त्यामूळे वादी हे प्रतिवादीकडून अंतरीम पोटगी मिळविण्यास पात्र आहेत. वादी क्र. २ चे वय दावा दाखल करतेवेळी १६ वर्ष, ३ चे वय १२ वर्ष व ४ चे वय १४ वर्ष नमूद आहे. कायद्यातील तरतूदींनूसार वादी क्र. २ ते ४ हे सज्ञान होइपर्यंत पोटगी मिळविण्यास पात्र आहेत.

१०. वरील विवेचनावरून वादी क्र. १ ही प्रतिवादीकडून रक्कम रू १०००/— दरमहा दाव्याचा अंतीम निकाल लागेपावेतो व वादी क्र २ ते ४ हे प्रत्येकी रू १०००/— दरमहा ते प्रस्तूतचा अर्ज दाखल झाल्यापासून सज्ञान होइपर्यंत अंतरीम पोटगी मिळविण्यास पात्र आहेत. त्यामूळे मी मूद्दा क्र. १ चे निष्कर्ष वरीलप्रमाणे नोंदवून मूद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादींचा अंतरीम पोटगीचा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र. १ ही दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत व वादी क्र. २ ते ४ हे ते सज्ञान होईपर्यंत प्रतिवादीकडून प्रस्तूतचा अर्ज दाखल झाल्यापासून प्रत्येकी रक्कम रू १०००/— दरमहा अंतरीम पोटगी मिळविण्यास पात्र आहेत.

**( बी. एस. संकपाळ)**
३रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
<u>बार्शी</u>

दिनांक :—३०/०१/२०१६.

## Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Lasane. |
| Court | : | 3rd Jt CJJD & JMFC, Barshi. |
| Date: | : | 30/01/2016 |
| Judgment/Order signed by the presiding officer | : : | 30/01/2016 |
| Judgment/Order uploaded on | : : | 03/02/2016 |